माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक २ ला नवी मुंबई दिनांक १ ते २८ फेब्रुवारी २०२१ पाने ८ किंमत २० रूपये

## माहिती अधिकार वापरा, गाव भ्रष्टाचार मुक्त करा.




## गावपातळीवर काम कसं करायच ?




काळे सरकार,काळा हेतू आणि काळे चारित्र्य

## सत्ताधाऱ्यांची हिटलरशाही !




## गोष्ट मेंढा गावाची!

## भ्रष्टचार विरोधी लढाई !!

## RTI सक्सेस स्टोरी : महावितरणशी संघर्ष अर्थात लढाई उजेडाची !

मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●


शेखर कोलते
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी


जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०१ सेक्टर ०९ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : mediamansubhash@gmail.com



## संपादकीय..........



### काळे सरकार,काळा हेतू आणि काळे चारित्र्य

# सत्ताधाऱ्यांची हिटलरशाही !

भारतातील शेतकरी रस्त्यावर आंदोलन करू लागले.सरकारला हे आंदोलन हाताळता आले नाही. परिस्थिती अशी दिसत आहे की भारतांच्या सत्ताधाऱ्यांनी भारतांच्या नागरिकांबरोबर छुपे युद्ध पुकारले आहे. आज आचार्य अत्रे असते त्यांनी नक्की लिहलं असतं की, रस्त्यावर भिंती बांधणारे व खिळे ठोकणारे मूर्ख सत्ताधारी गेल्या दहा हजार वर्षात झाले नाहीत व पुढे ही होणार नाहीत.

पोलीस बळांचा वापर करून आंदोलकांचे दमण करायचे,आपल्या बगलबच्च्या हस्ताकाकरवी सरसगट शेतकऱ्यांना फुटीरतावादी ठरवून बदनाम करायचे.अशी सरकारची उघड चाल दिसून येत आहे.सरकारीची पावले हिटलरच्या पावलावर पडत आहेत आणि लोकशाही दिल्लीच्या वेशीवर अक्रोश करीत आहे.

हे सरकार काळे आहे, सरकारचा हेतू काळा आहे.एवढेच नव्हे तर सरकारचे चारित्र्य सुद्धा काळे आहे. हे सरकारच्या कृतीमधून सरकारनेच दाखवून दिले आहे.लोकांसाठी सरकार नसून सरकार साठी लोक आहेत.असा अहगंड सत्ताधाऱ्यामध्ये शिगोशिग भरला आहे.

अन्नदात्यांच्या घाम,अश्रू व रक्तावर हा देश पोसला गेला आहे.भारतीय शेतकऱ्यांचे जितके शोषण झाले तितके स्वातंत्र्यानंतर भारतात कोणाचेच झालेले नाही. शेतकऱ्यांच्या लूटीचा हिशोब मांडला तर आज पर्यंतच्या सर्व कॉंग्रेस,जनता पक्ष व भाजपा अशा सर्व सत्ताधाऱ्यांची बेअब्रू होईल.

संसद महान आहे पण संसदेपेक्षाही समस्त भारतीय जनता अधिक महान आहे. लोकशक्ती पुढे विनम्रपणे झुकलेलं सरकार हा लोकशाहीतील सर्वोच्च सौंदयबिंदू असतो.पण या विद्यमान दिल्लीश्वरांला अशा सौदर्यांचे वावडे आहे.सरकारचे कान लोकांच्या आवाजाकडे टवकारून असले पाहिजेत पण इथं तर सरकारच्या कानात अहकांराचं वारं भरलयं.जनतेंच दु:ख पाहून सरकारच्या डोळ्यात अश्रू आले पाहिजेत. पण इथं तर सरकार जनतेवर डोळें वटारून उभं आहे. यामुळे कायद्याची गुणवत्ता हा विषय मागे पडला व सरकारच्या हेतूवर शंका निर्माण झाली आहे.

सत्ता, संसद व सर्वोच्च न्यायालय या संस्था आमच्यासाठी नेहमीच आदारांची ठिकाणी राहिलेली आहेत. समस्त भारतीयांच्या व्यापक हितासाठी या संस्था आपापल्या मर्यादेत राहून परस्परांवर चेक ॲण्ड बॅलन्स साधत राहाव्यात हे संविधानाला अपेक्षित आहे.पण शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा फज्ज्या उडावा म्हणून केंद्रीय सत्ता व सर्वोच्च न्यायालय अंतर्गत संगनमत करीत आहेत.ही भारतीय लोकशाहीसाठी लाजीरवाणी गोष्ट आहे.

प्रश्न सोडवायचे नाहीत.उलट प्रश्नाभोवती गुंता निर्माण करून संभ्रम निर्माण करायचा अशी तिरकी चाल सरकार का करीत आहे हे सरकारलाच माहित.

कृषीव्यापार हा विषय केंद्र व राज्य या समाईक सूचीमध्ये घालण्याची घटना दुरूस्ती करून सदर कायदे राबविण्याची वा न राबविण्याची मूभा राज्यवर सोपवून केंद्र सरकार हा प्रश्न चूटकीसरशी सोडवू शकते पण सरकारची ही समस्या सोडविण्याची इच्छाच दिसत नाही.

## माहिती अधिकार वापरा, गाव भ्रष्टाचार मुक्त करा.

# गावपातळीवर काम कसं करायच ?

बहुतेक कार्यकर्ते गावपातळीवर एकट्याने काम करतात.त्यात फार धोका उदभवू शकतो.जेव्हा कार्यकर्ता गावाच्या ग्रामपंचायतीमध्ये माहिती अधिकार अर्ज टाकतो.तेव्हा सरंपच,उपसरपंच व पंच लोक त्या कार्यकर्त्याला शत्रू मानू लागतात.जेव्हा कार्यकर्ता रेशन दुकानाची माहिती विचारतो.रेशन दुकानदार त्याला शत्रू मानू लागतो.जेव्हा कार्यकर्ता गावाच्या तंटा समितीची माहिती विचारतो.तेव्हा तंटा समितीचा अध्यक्ष त्याला शत्रू समजू लागतो.बहूतेक गावात सरंपच, उपसरंपच, रेशन दुकानदार अशा गावातील बड्या लोकांना गावात कोणी माहिती अधिकार कार्यकर्ता असणे मुळीच आवडत नाही.कारण असा छोटा माहिती अधिकार कार्यकर्ता या बड्या लोकांना प्रश्न विचारतो.त्यांच्या चूकीच्या व भ्रष्ट कामाची माहिती बाहेर काढतो.तेव्हा गावातील बडे लोक माहिती कार्यकर्त्याना शत्रू समजू लागतात.मग ते अशा कार्यकर्त्यांवर या ना त्या मार्गाने दबाव आणतात. त्यांना गाव पातळीवर सत्ताधारी पार्टीच्या लोकांचा दबाव सहन करावा लागतो. सत्ताधारी दुखावले जातात. पण प्रत्येक अडचण आणि समस्या तुम्हाला पर्याय शोधायला प्रवृत्त करीत असते.ते पर्याय पुढीलप्रमाणे

### गावात समूहाने काम करा.

एकट्याला दाबून चूप करता येणं सोप असतं समुहाला चूप करणं शक्य नसंत.गावातल्या चाळीस पन्नास किंवा शक्य तो अधिक लोकांना माहितीचा अधिकार कसा वापरावा ?हे शिकवा.

गावातील तरुण युवकांना माहिती अधिकार कायदा कसा वापरावा हे शिकवा. गावातील ग्रम पंचायत, तलाठी सज्जा, सरकारी दवाखाना, पोलीस चौकी, शाळा आंगणवाडी, रेशन दुकान इत्यादी ठिकाणी माहिती अधिकार अर्ज टाकत चला या मुळे त्या त्या ठिकाणी पारदर्शकता वाढीस लागेल.

आळी पाळीने माहिती अधिकार अर्जदार बदलत चला.गावातील संवेदनशील प्रकरणात गावा बाहेरील माहिती अधिकार कार्यकर्त्याला फीड बॅक देऊन अर्ज करायला लावा.(याला पाहुण्याच्या काठीने साप मारणे असे म्हणतात)



तुमच्या गावातील गावकऱ्यांच्या लहान मोठ्या शासन प्रशासनातीलअडचणी समस्या सोडवायला मदत करा.

गावातील जे लोक पुणे-मुंबई व अन्य शहरात नोकरी व रोजगारासाठी गाव सोडून गेले आहेत त्यांची यादी तयार करा. गावाच्या विकासासाठी गावत चांगलं काय करता येईल यांच्या सूचना व मदत हे लोक देऊ शकतात.

कोरोना संसर्ग रोगाच्या पार्श्वभूमीवर मूळ गावातील असणाऱ्या परंतु शहरात नोकरी धंदा करणाऱ्या लोकांना गावाचं महत्त्व समजलं आहे.या सगळया सकारात्मक लोकांना बरोबर घेऊन

### गावाचा एक छान वॉटसअॅप ग्रुप तयार करा.

गुगलवर पाणलोट विकास, वॉटर फाउंडेशन, गाडगेबाबा स्वच्छता अभियानात बक्षीस मिळालेली गावे, देशभरातील राष्ट्रपती पुरस्कार मिळालेली शेकडो आदर्श गावे यांच्या मुलाखती व्हिडीओ,कथा व माहिती असे भरपूर साहित्य मिळते. रोज एक दोन पोष्ट वॉटसअप ग्रुप वर टाकत चला.

गावात सत्ताधारी व विरोधीपक्ष अशी दुफळी असेल तर दोन्ही पार्ट्यांपासून समान अंतरावर दूर रहा.

गावातील विरोधी पक्ष तुम्हाला सत्ताधाऱ्या विरोधात वापरून घेणार नाही याची काळजी घ्या.गावातील चांगल्या समजदार व जेष्ठ नागरिकांना सोबत घेऊन गाव विकास समिती किंवा असंचं एकाद छान नाव घेऊन एक संस्था स्थापन करा.या संस्थे मार्फत गावात वाचनालय, अभ्यासिका, व्याख्यानमाला , महिन्यातून

## गावपातळीवर काम कसं करायच ?

एकदा ग्राम स्वच्छता असे उपक्रम सुरू करा.

गावातल्या समजदार लोकांना सोबत घेऊन ग्राम विकासात उत्तम काम करणारे हिवरे बाजार, भास्कर राव पेरे यांचे पाटोदा असे उत्तम गावे दाखवण्यासाठी सहलआयोजित करा.

गावातील मुलांना गावातचं रोजगार मिळेल असे काही कमी भांडवलाचे व छोटे व्यवसाय करायला प्रवत्त करा. छोटया व्यवसायतूनच एकादा व्यवसाय खूप मोठा होऊ शकतो.

असं केलं तर तुमच्या हेतू वर कोणी शंका घेणार नाही.गावातीलसर्व सामान्य लोंकांची तुम्ही मने जिंकू शकाल.मग गावातले सत्ताधारी तुमच्यावर दबाव आणण्यापूर्वी दहा वेळा विचार करतील.

फक्त अर्ज करायचे, आपल्या कामाचा लॉजिक एन्ड करायचा नाही. असे केले की सत्ताधार्यांना वाटते की आम्हाला हेतुपूर्वक त्रास देण्यासाठीच अर्ज केला आहे. मग माहिती अधिकार हे निमित्त ठरतं आणि सत्ताधाऱ्यांचा अहंकार दुखावला जातो आणि ते तुम्हाला शत्रू समजू लागतात.उलट फक्त बेकायदेशीर कामे व भ्रष्टाचार या दोन गोष्टीत तडजोड केली जाणार नाही. बाकी इतर कामात कामात सत्ताधार्यांना मदत केली जाईल. अशी भूमिका घ्यावी.जर सत्ताधारी मंडळीने चांगले काम केले तर अभिनंदन पत्र ही लिहीत चला.हा माणूस फक्त माहिती अधिकार टाकीत नाही तर चांगल्या कामासाठी मदत करतो असे सत्ताधाऱ्याना वाटले पाहिजे.असं काम करा.तुमच्यातलां कार्यकर्ता इतका मजबूत घडवा की गावातील सगळे शेतकरी शेतमजूर महिला तरूण मुले यांना तुमच्या कार्याबद्दल आदर वाटला पाहिजे.

स्वत:च चारित्र्य स्वच्छ व पारदर्शक ठेवा. चांगल्या कामात सगळयांना सहकार्य करण्याची वृत्ती ठेवा.तुमच्यातल्या नेतृत्वगुणांचा उत्तुंग विकास करा.सुरुवात माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून करा. पण गावाचा चेहरा मोहरा बदणारा सशक्त नेता अशी तुमची प्रतिमा तयार झाली पाहिजे असं संकल्प करून काम चालू ठेवा.चांगली लिडरशीप निर्माण झाली की खराब लिडरशीप तोंड लपवून बसते.गावपातळीवर कौशल्याने काम करून आपला चांगुलपणा वाढवला की आपल्याला कोणी हात लावू शकत नाही.सगळयांना बरोबर घेऊन तुमचं गाव आदर्श करा.तुम्ही फक्त गावाचा सर्वांगिण विकास कसा होईल हा ध्यास घेऊन काम केलं की तुमचा सुद्धा एक नेता म्हणून व एक माणूस म्हणून उत्तूंग विकास होणार म्हणजे होणारचं.

## सगळ्यांच्या हितामध्येच माझे हित

आजच्या समाजात भ्रष्ट माणसांला प्रतिष्ठा मिळते आहे. लाच खाऊन वरकमाई करणाऱ्या माणसांचे कौतूक केले जात आहे.इतरांच्या मजबूरीचा फायदा घेऊन, इतरांचे शोषण करून, इतरांची फसवणूक करून जरी पैसे कमावला जात असला तरी समाज त्यावर आक्षेप घेत नाही. ही आजची खरी शोकांतिका आहे.

जे नागवे झाले आहेत त्यांचे कौतूक होत आहे. आणि जे नागवे नाहीत त्यांना नागवे होण्याची घाई झालेली आहे.

भ्रष्टाचार आमच्या डी.एन.ए.चा हिस्सा झाला आहे.

१. चिंतन २.विचार ३.दृष्टिकोन ४.वर्तवणूक ५.निर्णय या पातळीवर सगळा बेसीक लोच्या झालेला आहे.

मूलत: चिंतन चूकलं की विचार,दृष्टिकोन,वाचा,वर्तवणूक व निणर्य असा प्रत्येक टप्पा चूकीचा ठरतो.

प्रत्येक क्रिया तून एक प्रतिक्रिया उत्पन्न होऊन परत आपल्याकडे येतअसते. चांगलं कृत्य केलं तर आपल्याकडे येणारी प्रतिक्रिया चांगलीच असते. वाईट केलं तर आपल्याला येऊन मिळणारी प्रतिक्रिया वाईटच असते.

इतरांच्या हितसंबंधाना बाध आणून एक व्यक्ती त्यांचा तत्कालीन स्वार्थ साधू शकतो. पण त्याचे समाजावर होणारे दीर्घकालीन दुष्परिणाम स्वार्थ करणाऱ्या व्यक्तीला व त्याच्या कुटुंबियांनाही भोगावेच लागतात. म्हणून सगळयांच्या व्यापक हितामध्येच माझे हित सामावले आहे.

हा साधा,सरळ व व्यापक दृष्टिकोन आपण कायम लक्षात ठेवून आपल्या विचार,बोलणे व वागणे व निर्णय घेणे ठरविले पाहिजे.

# गोष्ट मेंढा गावाची! लढाई भ्रष्टचार विरोधी !!

गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यात मेंढा नावाचं आदिवासी बहूल गाव आहे.या गावानं त्यांच्या ग्रामसभेत एक ठराव केला आहे.गावातील एकही गावकरी त्याच्या सरकारी कामासाठी कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांला लाच देणार नाही.कोणत्याही गावकऱ्यांचा अडलेलं सरकारी काम हे पूर्ण गावांच काम समजलं जाईल. व पूर्ण गांव मिळून ते काम पूर्ण करून देईन.इतर गावतील गावकऱ्यांप्रमाणे मेंढा गावातील गावकऱ्यांही रेशनकार्ड, उत्पन्नांचा दाखला,जातीचा दाखला,वीज जोडणी, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र अशा कितीतरी कामासाठी तालुका, जिल्हा इत्यादी ठिकाणी सरकारी कार्यालयात जावं लागतं.

आपल्याला माहित आहे अशा विविध कामासाठी सरकारी अधिकारी कर्मचारी लाच मागतात.

पण मेंढा गावातील ग्रामसभेनं अशा भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी यांना कसा धडा शिकवायचा याची एक कार्यपद्धती ठरवली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.

जर कोणी सरकारी कर्मचारी अधिकारी पैसे मागत असेल तर त्याला सांगायचे मी पैसे देतो पण मी दिलेल्या पैशाची मला पावती द्या.

जर सरकारी अधिकारी पावती ही देत नसेल व पैसे मागत असेल तर त्याला पैसे द्यायचे नाहीत.


दिवसभर त्यांच्या सरकारी कार्यालयात बसून राहयचं. आपला कागद मिळवणं हा आपला हक्क आहे.

दिवसभर बसूनही जर पैसे (लाच) दिली नाही म्हणून कागद दिला नाही किंवा काम केल नाही तर रात्री ग्रामसभेत त्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची तक्रार नोंदवायची.

मग दुसऱ्या दिवशी अर्जदाराबरोबर गावातले अन्य दहा लोक त्या सरकारी कार्यालयात जातील आणि सरकारी अधिकाऱ्यांना सांगतील की आमच्या ग्रामसभेनं आम्हाला पाठवलं आहे. आणि आम्ही एक पै ची सुद्धा लाच देणार नाही. आम्ही तुम्हाला पैसे देऊ पण तुम्ही त्यांची पावती दिली पाहिजे.

या दहा जणांनाही सरकारी अधिकारी यांनी दाद दिली नाही. तर ते परत जातात.

गावाच्या ग्रामसभेत दहाजण आपला रिपोर्ट देतात.




मेंढा गावाची इंत्यंभूत माहिती असणारे मिलिंद बोकील यांचे पुस्तक जरूर वाचा.

मग तिसऱ्या दिवशी गावतील सगळे महिला-पुरूष , मुलं -बाळ, तरूण -म्हातारी असा सगळा गांव त्या सरकारी कार्यालयावर चाल करून जातो.

पुन्हा तिथं तीच अट ठेवली जाते. पैसे दिले जातील पण आम्हाला पावती द्या.

कार्यालयात जेव्हा दिडशे दोनशे गावकरी आलेले पाहून तिथल्या कर्मचारी व अधिकारी यांची भंबेरी उडते. आणि त्या गावाचं रखडलेलं सरकारी काम झटकण पूर्ण होतं.

सुरवातीला अशा अडलेल्या एका व्यक्तीच्या कामासाठी जेव्हा सगळा गाव धाऊन जाऊ लागला सरकारी कार्यालयात मेंढा गावाच्या नावाचा एक नैतिक दबाव निर्माण झाला.

एकाला लाच मागीतली तर सगळा गांव मदतीला धाऊन येतो. हे माहिती झाल्यामुळे आता मेंढा गावाचं एकही काम सरकारी बाबू रखवत नाहीत.

तिथले सरकारी अधिकारी मेंढा गावच्या अर्जदारांच काम सगळ्यात पहिल्यांदा पूर्ण करून ठेवतात.

मित्र हो,मेंढा गावचं अनुकरण आपल्या गावात आपणही करायला पाहिजे नाही का ?

# RTI सक्सेस स्टोरी : महावितरणशी संघर्ष अर्थात लढाई उजेडाची !




ऑगष्ट २०२० महिन्याच्या शेवटच्या दिवशी मला एक फोन आला. हॅलो, सुभास सर बोलताय का ?

मी म्हणालो हो, बोलतोय ...

मी मु.पो.कुरोली ता.खटाव जि.सातारा येथून दत्तात्रय देशमुख नावाचा शेतकरी बोलत आहे. सर, मी जून २०१९ मध्ये महावितरण कडे माझ्या शेतातील घरामध्ये नवीन विद्युत कनेक्शन मिळावे म्हणून अर्ज केला तसेच विद्युत जोडणीसाठी रितसर १८०० रूपयांचे कोटेशन व जोडणी शुल्क चलनाद्वारे भरले आहे.सर्व योग्य ती कागदपत्रे दिली आहेत.पण गेले चौदा महिने झाले मी लाईटमॅन व महावितरण अभियंता यांच्याकडे चकरा मारून दमून गेलो आहे.पण मला वीज कनेक्शन मिळत नाही.

आज देतो उद्या देतो व लवकरच देतो. असे कारण सांगून मला टाळत आहेत.सर मी वैतागून गेलो आहे. तुम्ही मला मदत करा. खरं तर कोटेशन भरल्यापासून सात दिवसांच्या आत विद्युत कनेक्शन मिळालं पाहिजे हा नियम आहे. इथे चौदा महिने विलंब का होत आहे हे मला कळेना.

मी त्यांची सगळी माहिती काढली. तेव्हा कळलं की त्यांच्या शेजारी शेतात राहणारा सख्खा भाऊ हनुमंत देशमुख यांनी भाऊ दत्तात्रय देशमुख यांना कनेक्शन मिळू नये म्हणून महावितरण कडे गुपचूप अर्ज केला आहे.आपल्याच एक सख्या भावाला कनेक्शन मिळू नये म्हणून दुसरा भाऊ लाईटमॅन व अभियंता यांना (कदाचित चिरीमिरी देऊन) कनेक्शन देऊ देत नाही.अशी माहिती समोर आली.

आता पुढे काय करायचं हे दत्तात्रय देशमुख यांना कळत नव्हते.पण कायदेशीर पाऊल उचलण्यासाठी मी दत्तात्रय देशमुख यांना महावितरणच्या तक्रार निवारण कक्षात करायचा अर्ज बनवून दिला.

तसेच विद्युत कनेक्शन मिळावे म्हणून दीड वर्षापूर्वी अर्ज केलेला असूनही कनेक्शन मिळाले नाही. माझ्या अर्जावर सक्षम अधिकारी यांनी काय कारवाई केली. काय शेरा व टिपण्णी केली या विषयी एक माहिती अधिकार अर्ज केला.

माहिती अधिकार अर्ज करताच.महावितरण चे अधिकारी सक्रीय झाले व यंत्रणा हलली. जून्या फाईल व अर्ज शोधून काढले गेले.

पुढचा टप्पा म्हणजे महावितरणच्या तक्रार कक्षात सातारा येथे अर्जदारांच्या उपस्थित मध्ये सुनावणी झाली. त्यावेळी महावितरण अभियंता यांनी सांगितलं की कोराना असल्यामुळे विलंब होत आहे व सख्या भावानी आक्षेप घेतला आहे. मग आम्ही कोरोना तर मार्च २०२० मध्ये आला. विज कनेक्शन साठी अर्ज जून २०१९ मध्ये दिला होता कोरोना च्या अगोदार दहा महिने का कनेक्शन दिले नाही ? व भावाचा आक्षेप आहे तर ते लपवून का ठेवले ? असा युक्तीवाद केला.

पण तक्रार निवारण कक्षाने महावितरणच्या कायदेशीर सल्लागाराचा अभिप्राय मागावा लागेल.असे कारण सांगून आमचा अर्ज फेटाळला.

मग देशमुख यांना मी महावितरण ग्राहक तक्रार मंचाकडे बारामती येथे अपिल करण्यासाठी अर्ज बनवून दिला.अपिलात उत्तम युक्तीवाद केला व महावितरण कनेक्शन देण्यात जाणीवपूर्वक कशी लबाडी करीत आहे. हे विस्ताराने मांडले.इकडे अर्ज मंचाकडे पोहचला आणि तिकडे अभियंत्याने कनेक्शन देण्यासाठी लाईटमॅनला पाठवले.व शेतातीलघरात मिटर बसवले असे देशमुख यांच्या पत्नी संध्या देशमुख यांनी मला फोन करून कळविले.

मी कायदेशीर मदत केली पण लढाई देशमूख लढले.एक गरीब शेतकऱ्यांच्या शेतातील घरात पंधरा महिन्याच्या संघर्षानंतर लाईट आली. जेव्हा शेतातील घरात लाईट लागली व उजेड पडला तेव्हा हे देशमुख यांनी फोटो व्हाटसॲप वर पाठवून दिले.

# टोल नाका माहिती अधिकार नमूना अर्ज

माहिती अधिकार कार्यकर्ते मित्रहो,

नागरिक अधिकार मासिकांच्या प्रत्येक अंकात एका कार्यालयाचा माहिती अधिकार नमूना दिला जाईल.हा नमूना केवळ दिशदर्शक व अभ्यासासाठी आहे. हा नमूना तुम्ही सोयी प्रमाणे काही बदल करून तुमच्या जबाबदारीवर वापरू शकता.

चांगले रस्ते हवेत तर टोल द्यावा लागेल अशी शासन संस्कृती रूजलेली आहे.नागरिक ही टोल द्यायला तयार आहेत.पण टोल चा जमा खर्च व अर्थिक बाबतीत संपूर्ण पारदर्शकता असणे ही नागरिकाची किमान अपेक्षा आहे.

टोल हे सत्ताधारी व ठेकेदार यांनी मिळून जनतेला लूटण्याचे अस्त्र होता कामा नये म्हणून टोल संदर्भात माहिती अधिकार वापरून आपण अधून मधून माहिती घेत राहिलं पाहिजे.

---

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
सार्वजनिक बांधकाम विभाग / राज्य / केंद्रिय रस्ते विभाग /
जिल्हा -----------------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : --------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :--------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व कालावधी :

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये --------------------या टोलनाक्याची टोल सुरू झाल्यापासून ची ते आज अर्ज केलेल्या दिवसाअखेर पर्यंत ची माहिती द्यावी.

४) माहितीचा तपशील :

१. टोल सुरू झाल्याची तारीख २. प्रकल्पाची भांडवली किंमत ३. आज पर्यंत जमा झालेला एकत्रित टोलमहसूल
४. टोलप्लाझावर प्रवाशांसाठी सवलती व सुविधा ५. टोल सुरू करताना केलेल्या रहदारी अहवाल.
६. स्थानिक वृत्तपत्रात फी अधिसूचना ७. टोलभरण्यापासून सवलत असलेल्या वाहनांची यादी
८. टोल कंपनी व शासन यांच्यात झालेल्या कराराची प्रत. ९. संपूर्ण तक्रारवही ची झेरॉक्स मिळावी.
१०. टोल वसूली बंद होणार असल्याची तारीख. इत्यादीचा लेखी नोंद असलेल्या छायाप्रती द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: स्पीड पोष्टाने पाठवावी /माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : -----------------

दिनांक : ---------------- (नाव ---------------------------)

## रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.

## www.instamojo.com/subhashbaswekar


















# www.rtimahasangh.weebly.com

## www.facebook.com/rtimahasangh/

## Whats App - 9223516920

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४ -बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले.

RNI रजि नं. MAHMAR/2011/40781